2013-14

ISSN No.- 2231-5063

# Golden Research Thoughts



www.aygrt.net

Published By
**Laxmi Book Publication**
258/34. Raviwar Peth Solapur-413005, Maharashtra
Contact- +91-9595-359-435
Email-ayisrj@yahoo.in / ayisrj2011@gmail.com
Website-www.isrj.net

Editor-in-Chief
Prof. Tukaram Naryan Shinde

Publisher
Dr.Ashok Yakkaldevi

Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 11, May. 2013
ISSN:-2231-5063

Available online at www.aygrt.isrj.net

ORIGINAL ARTICLE

GRT

# मध्ययुगीन सोलापूरातील वतनदार आणि त्यांचे वाडे

स्वराली चंद्रकांत कुलकर्णी

एस.एन.डी.टी. कला व वाणिज्य महाविद्यालय, कर्वे रोड, पुणे

**सारांश:**

मध्ययुगीत कालखंडात सोलापूर शहरात 3 वतनदार होते. बहामनी काळापासून ते पेशवाई संपेपर्यंत व्यापार विषयक, संरक्षण विषयक आणि किल्ल्याच्या बाबतीत या तिघांवर वेगवेगळ्या जबाबदाऱ्या टाकलेल्या दिसतात. पेशव्यांच्या कालखंडात सोलापूरातील बाजारपेठ वसविण्याची जबाबदारी या तीन वतनदारांवर टाकलेली होती. त्याबाबतची अस्सल कागदपत्रे, वंशावळी त्यात्या वतनदारांकडे मिळतातच, याशिवाय प्रकाशित साधनां मधुनही याबाबतची माहिती मिळते. देशमुख, देशपांडे, शेटे हे तीन प्रमुख वतनदार होते या वतनदारांचे मध्ययुगीन काळात बांधले गेलेले वाडे, त्यांची प्रवेशद्वारे आजही सुस्थितीत आहेत.

**प्रस्तावना :–**

देशमुख यांचा वाडा – बहामनी काळापासून ते भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंत सोलापूरात हे वतनदारीचे अधिकार उपभोगीत होते. त्यांच्यामध्ये देशमुख, देशपांडे, शेटे यांच्या नावाने आदिशाहीकालीन, पेशवेकालीन, ब्रिटिशकानील सनदाही मिळालेल्या आहेत. ही अस्सल, मूळ व अप्रकाशित साधने सोलापूरच्या इतिहासावर प्रकाश टाकणारी आहेत. देशमुख घराणे हे एक हजार वर्षांची परंपरा असणारे शहरातील महत्त्वाचे घराणे आहे. यांच्या घराण्यातील कर्तृत्ववान स्त्रीशासक चामलादेवी देसाई ही होती. तिने सिद्धेश्वरांना तलाव बांधण्यासाठी आणि मंदिर बांधण्यासाठी जमिन दिलेली होती. मराठा काळात या देसायांचे देशमुख हे नाव रूढ झाले. या घराण्यास बहामनीच्या काळापासून व त्यापूर्वी अनेक हक्क व अधिकार राजसत्तेकडून मिळालेले होते. या घराण्याचे वारसदार देशमुख यांच्या संग्रही असलेली आदिलशहाने या घराण्यास दिलेली 98 अस्सल पत्रे इतिहास संशोधक ग.ह. खरे यांनी भा.ई.सं.मंडळात नेवून त्या पत्राचे रूपांतर केले आहे. या घराण्यांनी जतन करून ठवलेल्या दप्तरात इतिहास संशोधकांना इ.स.1524, 1528, 1568 या सालचे सर्वात जुने कागद मिळाले. महाराष्ट्रातील सर्वात जुना व मोडी कागद ही या दप्तरात मिळाला. या देशमुख घराण्याने सोलापूर शहरासाठी अनेक प्रशासकीय व न्यायालयीन कामे केलेली असून यांना पोलिस पाटिलकीचे 80 गावामध्ये जमिनी मिळाल्या होत्या. एखाद्या मोठया राजसत्तेचे मांडलिक असल्याप्रमाणे हे रहात असत शहराच्या मध्यवर्ती भागात असणारा त्यांचा वाडा ऐतिहासिक परंपरेची साक्ष देणारा आहे.1

सोलापूरमध्ये गणेचारी (धार्मिक विधीसाठी नेमलेले पंडित) नेमण्याचा अधिकार होता. पुरातन काळापासून या घराण्यातून श्रीशैल्य येथील सिद्धेश्वरांना काष्ठ पाठविले जाते. सिद्धेश्वरांसाठी यात्रेत वापरला जाणारा सोमदंड यांच्या घरात असून गड्डा यात्रेचे सर्व धार्मिक कार्यक्रम देशमुखांच्या वाडयातच सुरू होतात. ऐतिहासिक वारसा सांगणारा हा वाडा आजही सुस्थितीत असून या वाडयामध्ये अनेक जुन्या वस्तू व कागदपत्रे जतन करून ठेवलेली आहेत. सोलापूरच्या मध्ययुगीन इतिहासात मुस्लिम आणि हिंदु राजवटीबरोबर योगदान देणारे हे देशमुख घराणे व त्यांचा वाडा ऐतिहासिक वैभवात भर टाकतात.2

**देशपांडे यांचा वाडा :**

मध्ययुगीन काळापासून सोलापूरच्या इतिहासात देशमुखाप्रमाणेच देशपांडे यांनाही महत्वाचे स्थान आहे. थोरले माधवराव पेशव्यांनी सोलापूरातील बाजारपेठ वसविण्याचा हक्क या पिढीजात वतनदारांना दिल्याचे स्पष्ट होते.3 तसेच दुसरे बाजीराव पेशवे व त्यानंतर इंग्रजांनी वतनदारीच्या सनदा नूतनीकरण करून यांनाच दिल्याचे स्पष्ट होते. या घराण्याचा मूळ पूरूष तित्रसपंत देशपांडे यांना बहामनी सम्राटाने किल्ल्यांचे बांधकाम करून सोलापूर शहरास अन्नाण्याचे आबादी करावे असे सांगितल्याचे समजते कारण या देशपांडे वतनदारांच्या वारसाकडे सुमारे 400 वर्षापूर्वी लिहून तयार केलेली वंशावळ ही अमित देशपांडे यांनी जपून ठेवली आहे. ही वंशवळ चढईवर कापड लावून मोडी लिपीत लिहलेली 8 इंच लांब व 23 इंच रूंद आहेत. बिदरच्या बहामनी सम्राज्याकडून आणि वजीर कालासुजा यांच्याकडून सोलापूरातील किल्ला बांधण्यासाठी देशपांडेना वतनदारी देण्यात आल्याचे आणि त्यासाठी वतनाच्या शिलका व ताम्रपट दिल्याचेही वंशावळीत दिसते. ती त्रिप्रसपंतानंतर दोन शाखा 1.थोरल्या शाखेकडे सोलापूर किल्ला, 2. धाकटया शाखेकडे धोत्रीची गढी सोपविल्याचा उल्लेख आढळतो.

देशपांडयांना सोलापूर परगण्यात 48 गावांच्या इनाम जमिनी आणि सोलापूरच्या उत्पन्नापैकी 3 / 4 चौपाई हिस्सा त्यांना मिळत असे. इ.स.1918 मध्ये ब्रिटिशांचे राज्य सोलापूरात आल्यावर हीच वंशावळ ब्रिटिशांनी पुरावा मानून देशपांडे यांना त्यांचे पूर्वीचे वतन दिले.4 सुमारे एक एकरावर प्रमुख देशपांडेचा वाडा असून तो सुस्थितीत आहे. यात घोडयाच्या पागा, कारंजे, जुने देवघर, स्त्रियांची दालने, दिवाणखाना इ. भाग होते. आजही वाडयाचे मुख्य आणि पिछाडीचे प्रवेशद्वार अतिशय देखणे व सुस्थितीत आहे. ही प्रत्यक्ष सर्वेक्षणाच्यावेळी लक्षात आले.5 आदिलशाही काळापासून ते ब्रिटिश काळापर्यंत शिकून राहिलेल्या पिढीजात वतनदार देशपांडे यांचे ऐतिहासिक मूल्य महत्त्वाचे ठरते.

*शेटे यांचा वाडा :*

बहामनी काळापासून वतनदारीचे हक्क परंपरेने मिळालेले शेटे हे मध्ययुगीन इतिहासाचे आधारस्तंभ ठरतात. या शेटयांचे आजचे वारसदार बाळासाहेब शेटे यांच्याकडे थोरल्या माधवराव पेशव्यांनी मंगळवार पेठ वसविण्यासाठी शेटयांना दिलेली सनद, बाजीराव पेशवे दुसरे यांनी शेटयांना व्यापाराचे दिलेले हक्क तसेच पेशवांकडून मिळालेली 52 हक्कांची सनद अशा अस्सल सनदा आहेत. ब्रिटिश काळात मधला मारुती, मंगळवार पेठ बाजार, कुंभारवेस मारूती याबाबतचा व्हिक्टोरिया राणीकडून मिळालेला हुकुमनामाही पहावयास मिळतो.6 शेटयांना मंगळवार पेठ वसविण्याबाबत सनदेचा उल्लेख ही इतर कागदपत्रात पहावयास मिळतो.7 माधवराव पेशव्यांनी सोलापूरातील 3 पावशेर जमिन दिल्याचा आणि तुळजापूराजवळ सावरगाव येथे काही हक्क व वतन मिळाल्याचा उल्लेख मिळतो. मंगळवार पेठेत सराफ कट्टयावर शेटयांचा वाडा आज उध्वस्त अवस्थेत उभा आहे.8 शेटे वाडयात आदिलशाही कालीन हत्यारे, पेशवेकालीन तलवारी, कर्नाटकी ढाल व ऐतिहासिक वस्तुही आहेत. शेटे घराण्यास आदिलशाही काळापासून परंपरेने अनेक हक्क असून त्यांच्याकडे असलेली कागदपत्रे मोडी लिपीत असून अजूनही ती प्रकाशित झाली नाहीत. मात्र ती इतिहासातील अस्सल साधने असल्याचे स्पष्ट होते.9 शेटे वाडयात न्यायालयीन कामकाज चालत असे या काळात विजापूर वेस ते तुळजापूर वेस आणि कुंभारवेस ते बाळीवसे असा सोलापूरचा मर्यादित विस्तार होता. या छोटयाशा सोलापूरसाठी विजापूरहून शाही फर्माने निघत. त्यामध्ये सोलापूरातील वतनदारांचा उल्लेख वारंवार येतो.

एकंदरीत सोलापूरच्या मध्ययुगीन इतिहासात / ब्रिटीशकालीन इतिहासात या घराण्याने मोलाची भर घातली आहे.

*संदर्भ साधने :*


1. प्लेट क.1
2. चेट्टीनाड कन्नड साहित्य संमेलन 2006, संशोधन लेखातून
3. दै.सकाळ 17 जून 2006 संशोधन लेखातून
4. प्लॅट क.2
5. प्लॅट क.3
6. शेटे यांच्याकडील कागदपत्रे आणि मुलाखतीतून
7. मराठेकालीन समाजदर्शन, शं.ना.जोशी, पृष्ठ क.69–72
8. प्लॅट क.2
9. सोलापूर सकाळ 18 जून 2006, भाग – 2, ऐतिहासिक शस्त्रसाठा आणि दस्तऐवज या संशोधनपर लेखातून